# वनबंधु कल्याण योजना
# कंत्राटी ए.एन.एम.(ANM) पदभरती
## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नाशिक
## Walk in Interview

आदिवासी विकास विभागामार्फत वनबंधु कल्याण योजना अंतर्गत **सुरगाणा तालुक्यातील आश्रमशाळा करीता ए.एन.एम. पदभरतीसाठी** करार पद्धतीने पात्र उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखत **(Walk in Interview)** प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविण्यात येणार आहे.

**दिनांक :- ०३/०८/२०२१ वेळ :- स.०९.०० ते स.११.०० वाजेपर्यंत अर्ज स्विकृती**
**स्थळ :- श्री.रावसाहेब थोरात सभागृह, जिल्हा परिषद, नाशिक**

| पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | वय | पदसंख्या | एकूण एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| ए.एन.एम. (ANM) | ए.एन.एम.कोर्स उत्तीर्ण (शासकीय मान्यताप्राप्त संस्था) व मुंबई नर्सिंग कौन्सिल नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक) (शासकीय अनुभव असल्यास प्राधान्य) | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे (वय वर्ष ६० नंतर जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडून शारिरिक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र) | अनुसुचित जमाती (ST) – १२ | रु.१८०००/- |

उपरोक्त पदाकरीता अटी व शर्ती, अर्जाचा नमुना व सविस्तर जाहीरात www.zpnashik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात आलेली आहे.

**अटी व शर्ती:-**

१) इच्छुक उमेदवारांनी प्रत्यक्ष विहित नमुन्यातील अर्जासोबत १) वयाचा पुरावा, २) शैक्षणिक अर्हतेची सर्व आवश्यक प्रमाणपत्र, पदवी/पदवीका प्रमाणपत्र(सर्व वर्षांचे), ३) गुणपत्रिका, ४) कौन्सिल नोंदणी प्रमाणपत्र ५) जात / वैधता प्रमाणपत्र ६) शासकीय / निमशासकीय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र इ. कागदपत्रे (मुळ कागदपत्रे व छायांकित प्रत) सह उपस्थित रहावे.
२) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.
३) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.
४) केंद्र/राज्य शासनाने संबंधित पदे नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.
५) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
६) कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी.
७) प्रथम नियुक्ती ही दि.३१/०३/२०२२ पर्यंत देण्यात येईल व त्यापुढील नियुक्ती आवश्यकतेनुसार व उमेदवाराच्या कामकाजाच्या अहवालानुसार देण्यात येईल.
८) संबंधित प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सामाजिक आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध होईपर्यंत इतर प्रवर्गातील उमेदवारास तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.
९) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.
१०)निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.
११) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रकियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**स्वाक्षरी/-**
**अध्यक्ष,**
**निवड समिती,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

| Application No. : (Office Use only) | |
|---|---|

# वनबंधु कल्याण योजना
## कंत्राटी ए.एन.एम.(ANM) पदभरती
### आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नाशिक
## अर्जाचा नमुना

| पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजिकचा साक्षांकीत फोटो |
|---|

प्रति,
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

| **१) संपुर्ण नाव :** | **मराठी** | **इंग्रजी (कॅपीटल लेटर)** |
|---|---|---|
| आडनाव | ...................... | ............................ |
| स्वतःचे नाव | ...................... | ............................ |
| वडीलांचे/पतीचे नाव | ...................... | ............................ |
| आईचे नाव | ...................... | ............................ |

२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता : ........................................................................
........................................................................ पिनकोड :..................

३) दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक १)............................२) ........................

ई-मेल आयडी ................................................

४) जन्मतारीख :- / / दि.०३/०८/२०२१ रोजीचे वयः- .....वर्षे ....महिने ....दिवस

५) शैक्षणिक अर्हता :-

| **अ.क्र** | **उत्तीर्ण केलेली परिक्षा** | **विद्यापीठ/मंडळाचे नाव** | **परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** | **अंतिम वर्षाचे गुण** | **अंतिम वर्षाला मिळालेल्या गुणाप्रमाणे टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

**६) अनुभव**

| **संस्थेचे नाव व पत्ता (शासकीय / निमशासकीय / राष्ट्रीय आरोग्य अभियान)** | **कालावधी** | | **एकुण वर्ष** |
|---|---|---|---|
| | **पासुन** | **पर्यंत** | |
| | | | |
| | | | |

(खाजगी अनुभव ग्राहय धरला जाणार नाही)

७) आपणांविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय? असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा. होय ☐ नाही ☐

८) Computer Proficiency (MS-CIT) होय ☐ नाही ☐

९) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या असल्यास ✓ अशी खुण करावी.

१) विद्यापिठाचे प्रमाणपत्र ☐ पदवी ☐ पदविका ☐ पदव्युत्तर पदवी ☐
२) शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाचे गुणपत्रक ☐
३) अर्ज सामाजिक आरक्षणातून केला असल्यास जातीचे प्रमाणपत्र ☐
४) वयाच्या पुराव्यासाठी प्रमाणपत्र (दहावीची सनद / शाळा सोडल्याचा दाखला/ वयाचा दाखला / आधारकार्ड)
५) अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे ? काय होय/नाही
६) कौंसिल कडून चालु कालावधीतील वैद्य व्यवसायीक नोंदणी प्रमाणपत्र ☐
७) लहान कुटुंब प्रतिज्ञापन (नमुना अ)

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रदद् करणेत येईल तसेच अनुभव प्रमाणपत्रात पडताळणीसाठी संबंधित कार्यालयात पाठविण्यात येईल त्यावेळी माहिती खोटी आढळल्यास माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

सही/-

दिनांक :- / / नाव.................

**प्रतिज्ञापन**

**नमुना अ**

मी श्री./श्रीमती/कुमारी ..........................................................................

श्री..............................................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,.......................................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी .............................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ...............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-